## ेया लाइफसायन्सेस'ची समाजसेवेसाठीची तळमळ

# ाजिक उत्तरदायित्वाची नवी व्याख्या



ंपनीची वाढ करताना सतीश वाघ यांनी केमिक्सिलचे अध्यक्ष म्हणून अन्य ंना, आंतरराष्ट्रीय नियमांच्या चौकटीत सांभाळून निर्यात कशी करायची, ल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे केवळ उद्योगाचा विकास करण्याबरोबरच ूषण होऊ नये आणि परिसरातील जीवसृष्टीची हानी होऊ नये, याबरही टेकोर लक्ष ठेवले. त्यासाठी त्यांनी उद्योग संकुलांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्र र्यावरणपूरकतेशी असलेली बांधिलकी जपली. आपल्या धडपडीतून अन्य ी काही फायदा व्हावा, अन्य लोकांनीही काही शिकून घ्यावे, याकडे त्यांचा ले. सतीश वाघ यांचा प्रवास हा एखाद्या धूमकेतूसारखा क्षणभर संपून ही, तर ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ राहून इतरांना मार्गदर्शन करणारा आहे.

## ्र-रसायन क्षेत्रातील च : डॉ. सतीश वाघ













डॉ. सलोनी सतीश वाघ यांची 'सुप्रिया लाइफसायन्सेस'सोबतची वाटचाल ही सातत्यपूर्ण प्रगती, सखोल आकलन आणि धोरणात्मक नेतृत्वाची कहाणी आहे. रसायनशास्त्रातील पीएच.डी. आणि दृढ सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेल्या डॉ. वाघ यांनी संस्थेतील प्रत्येक घटक समजून घेत टप्प्याटप्प्याने आपला प्रवास घडवला. सर्वोच्च जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी व्यवसायाच्या प्रत्येक अंगाचा अभ्यास केला. आज 'सुप्रिया लाइफसायन्सेस लिमिटेड'च्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून डॉ. सलोनी सतीश वाघ या १२०हून अधिक देशांमध्ये निर्यात करणाऱ्या जागतिक एपीआय कंपनीचे नेतृत्व करत आहेत. या कंपनीच्या एकूण उत्पन्नापैकी ८४ टक्के महसूल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून येतो. त्यापैकी जवळपास निम्मा व्यवसाय नियमबद्ध बाजारपेठांमधून असून, त्यातील युरोपचा वाटा सुमारे ४० टक्के आहे. हा जागतिक विस्तार अनेक वर्षांच्या भक्कम पायाभरणीचा परिणाम आहे.

# ध्येय, दूरदृष्टी आणि जागतिक विस्तार

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. सलोनी वाघ यांचे दूरदर्शी नेतृत्व







# पुरुषप्रधान क्षेत्रात ठाम पाऊल, परंपरेला नवी दिशा

## सहव्यवस्थापकीय संचालक शिवानी वाघ यांचे नवी दिशा देणारे नेतृत्व

शिवानी वाघ यांनी २०१४ मध्ये 'सुप्रिया लाइफसायन्सेस लि.'मध्ये पाऊल ठेवले; तेव्हा त्या केवळ कुटुंबीय उद्योगात सहभागी होत नव्हत्या; तर १९८७ पासून उभ्या राहत गेलेल्या परंपरेची पुढील जबाबदारी स्वीकारत होत्या. पहिल्या पिढीतील उद्योजक डॉ. सतीश वाघ यांनी स्थापन केलेल्या या कंपनीने सक्रिय औषध घटक (एपीआय) निर्मितीत जागतिक स्तरावर ठोसशी ओळख निर्माण केली; मात्र शिवानी यांच्यासाठी हा वारसा पुढे नेण्याबरोबरच त्याला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू होता.














# ध्येय, दूरदृष्टी आणि जागतिक विस्तार

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. सलोनी वाघ यांचे दूरदर्शी नेतृत्व

**डॉ. सलोनी सतीश वाघ यांची 'सुप्रिया लाइफसायन्सेस'सोबतची वाटचाल ही सातत्यपूर्ण प्रगती, सखोल आकलन आणि ध्येयवादी नेतृत्वाची कहाणी आहे. रसायनशास्त्रातील पीएच.डी. आणि दृढ सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेल्या डॉ. वाघ यांनी संस्थेतील प्रत्येक घटक समजून घेत टप्प्याटप्प्याने आपला प्रवास घडवला. सर्वोच्च जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी त्यांनी व्यवसायाच्या प्रत्येक अंगाचा अभ्यास केला. आज 'सुप्रिया लाइफसायन्सेस लिमिटेड'च्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून डॉ. सलोनी सतीश वाघ या १२०हून अधिक देशांमध्ये निर्यात करणाऱ्या जागतिक एपीआय कंपनीचे नेतृत्व करत आहेत. या कंपनीच्या एकूण उत्पन्नापैकी ८४ टक्के महसूल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून येतो. त्यापैकी जवळपास निम्मा व्यवसाय नियमबद्ध बाजारपेठांमधून असून, त्यातील युरोपचा वाटा सुमारे ४० टक्के आहे. हा जागतिक विस्तार अनेक वर्षांच्या भक्कम पायाभरणीचा परिणाम आहे.**

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात विपणन विभागात काम करताना डॉ. सलोनी यांना ग्राहकांच्या अपेक्षा, नियामक अटी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील बदलत्या घडामोडींचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. औषधनिर्मिती क्षेत्रातील वाढ ही केवळ उत्पादन क्षमतेवर अवलंबून नसून विश्वासार्हतेवर आधारित असते, याची त्यांना जाणीव झाली. पुढे उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण तसेच संशोधन आणि विकास अशा विविध विभागांमध्ये काम करत त्यांनी कंपनीच्या कार्यपद्धतीचे सर्वंकष ज्ञान आत्मसात केले. या बहुआयामी अनुभवामुळे मोठ्या जबाबदाऱ्या स्वीकारताना संतुलित आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्याची त्यांची क्षमता अधिक बळकट झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली 'सुप्रिया लाइफ सायन्सेस'ने 'व्हॉल्यूम-ड्रिव्हन' मॉडेलमधून 'मार्जिन आणि क्षमता-केंद्रित' धोरणाकडे यशस्वी वळण घेतले. या रूपांतरणातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे लोटे परशुराम येथील प्रकल्पात 'मॉड्यूल ई'चे कार्यान्वयन होय, सुमारे १२० कोटी रुपयांच्या या विस्तारामुळे ३३५ 'केएल' क्षमतेची भर पडून एकूण क्षमता १३२ केएलवर पोहोचली. आर्थिक वर्ष २०२५-२६च्या पहिल्या सहामाहीत या क्षमतेचा वापर सुमारे ७८ टक्क्यांपर्यंत गेला. गुंतागुंतीच्या रसायन प्रक्रियांसाठी आणि दीर्घकालीन उत्पादन चक्रांसाठी डिझाइन केलेले मॉड्यूल ई, हे जागतिक नियामक मानकांनुसार उभारलेल्या भक्कम पायाभूत सुविधांबाबत त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे. त्याचबरोबर त्यांनी कंपनीच्या नवोन्मेष क्षमतेलाही चालना दिली. लोटे येथील केंद्र 'लाइफ सायकल मॅनेजमेंट' आणि 'बॅकवर्ड इंटिग्रेशन'वर लक्ष केंद्रित करत आहे, तर अंबरनाथ येथील केंद्र नवीन 'एपीआय' आणि फॉर्म्युलेशन विकासासाठी कार्यरत आहे. सुमारे ६० शास्त्रज्ञ ॲनेस्थेटिक्स, कॉन्ट्रास्ट मीडिया, कार्डिओव्हॅस्क्युलर आणि 'एडीएचडी' या क्षेत्रांतील उत्पादन विकसित करत आहेत. महसुलाच्या सुमारे दोन टक्क्यांपर्यंत संशोधन-विकास गुंतवणूक वाढवण्याचा कंपनीचा मानस असून, त्यामुळे दीर्घकालीन स्पर्धात्मकता अधिक मजबूत होत आहे.

आर्थिक कामगिरीतही या शिस्तबद्ध धोरणाचे प्रतिबिंब दिसून येते. आर्थिक वर्ष २०२५-२६च्या तिसऱ्या तिमाहीत कंपनीने २०६.४४ कोटी रुपयांचा महसूल आणि ७२.०८ कोटी रुपयांचा 'ईबीआयटीडीए' नोंदवला, तर ईबीआयटीडीए मार्जिन ३४.९ टक्के राहिले. करोत्तर नफा ४९.६८ कोटी रुपये इतका असून, सातत्यपूर्ण नफाक्षमता कायम राखण्यात कंपनीला यश आले आहे. जवळपास ८० टक्के महसूल पूर्णतः 'बॅकवर्ड इंटिग्रेटेड' असून कंपनी शंभर टक्के कर्जमुक्त आहे. अंतर्गत साठवलेल्या निधीचा विस्तारासाठी वापर करण्यात येत आहे. 'सीएमओ' आणि 'सीडीएमओ' भागीदारी वाढवण्यावरही त्यांचा भर असून, या करारांमधून २५ ते ३० कोटी रुपयांचे योगदान अपेक्षित आहे. पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे पाताळगंगा येथे प्रस्तावित ३५० कोटी रुपयांचा ग्रीनफिल्ड प्रकल्प, जो भविष्यातील महसूल दृश्यमानतेच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. डॉ. सलोनी वाघ यांचा प्रवास हे सातत्य, तयारी आणि दूरदृष्टीचे उदाहरण आहे. जागतिक स्तरावर भारतीय उद्योगाची ओळख अधिक भक्कम करण्यासाठी त्यांचे नेतृत्व निर्णायक ठरत आहे.





# पुरुषप्रधान क्षेत्रात ठाम पाऊल, परंपरेला नवी दिशा


## सहव्यवस्थापकीय संचालक शिवानी वाघ यांचे नवी दिशा देणारे नेतृत्व

**शिवानी वाघ यांनी २०१४ मध्ये 'सुप्रिया लाइफसायन्सेस लि.'मध्ये पाऊल ठेवले; तेव्हा त्या केवळ कुटुंबीय उद्योगात सहभागी होत नव्हत्या; तर १९८७ पासून उभ्या राहत गेलेल्या परंपरेची पुढील जबाबदारी स्वीकारत होत्या. पहिल्या पिढीतील उद्योजक डॉ. सतीश वाघ यांनी स्थापन केलेल्या या कंपनीने सक्रिय औषध घटक (एपीआय) निर्मितीत जागतिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली; मात्र शिवानी यांच्यासाठी हा वारसा पुढे नेण्याबरोबरच त्याला नवी दिशा देण्याचा प्रवास सुरू होता.**



मुंबई विद्यापीठातून बी.एम.एस. पदवी, त्यानंतर वाणिज्य विषयातील पदव्युत्तर शिक्षण आणि युनिव्हर्सिटी ऑफ मँचेस्टर (यूके) येथील मँचेस्टर बिझनेस स्कूलमधून आंतरराष्ट्रीय व्यवसाय व्यवस्थापनात (मार्केटिंग आणि फॉरेन ट्रेड विशेषीकरणासह) पदव्युत्तर पदवी, या भक्कम शैक्षणिक पायावर त्या उद्योगक्षेत्रात उतरल्या. औषधनिर्मिती, विशेषतः कडक नियामक निकष असलेले 'एपीआय' क्षेत्र, पारंपरिकरीत्या पुरुषप्रधान मानले जाते; मात्र वय आणि स्त्री या चौकटींपलीकडे जाऊन कामगिरीच्या जोरावर स्वतःची ओळख निर्माण करण्याचा त्यांचा निर्धार ठाम होता आणि ठरवलेले त्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि निग्रहाच्या जोरावर करून दाखवले.


गेल्या दशकभरात त्यांनी विक्री, विपणन, व्यवसाय विकास आणि जागतिक ग्राहक सहकार्य या सर्व क्षेत्रांत सक्रिय भूमिका बजावली आहे. समावेशक नेतृत्वशैली आणि परिणामाभिमुख, शिस्तबद्ध कामकाजाची पद्धत ही त्यांची वैशिष्ट्ये मानली जातात. संस्थेच्या दीर्घकालीन ध्येयाशी सुसंगत धोरणांची आखणी आणि प्रभावी अंमलबजावणी करत त्यांनी महसूलवाढ आणि नफाक्षमता दोन्ही बळकट करण्यास हातभार लावला आहे. विशेषतः युरोपीय बाजारपेठांकडे लक्ष केंद्रित करत, तेथील गुंतागुंतीच्या नियामक प्रक्रियांतून मार्ग काढत आणि त्यांचे पालन करीत त्यांनी कंपनीची तेथील उपस्थिती अधिक प्रभावी केली आहे.




रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे-परशुराम येथील अत्याधुनिक प्रकल्पाला अमेरिकेची 'यूएसएफडीए', युरोपची 'ईयूजीएमपी', 'ईडीक्यूएम', 'एनएमपीए' आणि 'हेल्थ कॅनडा' यांसारख्या आंतरराष्ट्रीय मान्यता लाभल्या आहेत. अँटीहिस्टामिन, अँटी-एलर्जिक, जीवनसत्त्वे, अॅनेस्थेटिक्स आणि अँटी-अस्थमॅटिक्स अशा विविध उपचारक्षेत्रांतील 'एपीआय' उत्पादनांमध्ये कंपनीचे भक्कम अस्तित्व आहे. मजबूत संशोधन-विकास पायाभूत सुविधा, सक्रिय 'यूएसडीएमएफ' आणि 'सीईपी' तसेच जागतिक मानकांनुसार अनुपालन या बळावर कंपनी नवोपक्रमक आणि जेनरिक औषधनिर्मात्यांशी भागीदारी करते. ग्राहकसंबंध दृढ करणे, नव्या बाजारपेठा मिळवणे आणि नैतिक मूल्ये व पर्यावरण, आरोग्य व सुरक्षा मानकांना प्राधान्य देणे, या बाबींमध्ये शिवानी यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या नेतृत्व प्रवासाला 'हुरून इंडिया'सारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर गौरविण्यात आले असून, भारतीय औषध उद्योगातील नव्या पिढीतील उद्योजक म्हणून त्यांची वाढती छाप अधोरेखित झाली आहे. त्या नेहमीच त्यांच्या नेतृत्वाला सामूहिक प्रगतीची दिशा देत आल्या आहेत. "फार्मास्युटिकल व्यवसाय हा केवळ उद्योग नाही; ती एक जबाबदारी आहे. आपण आखलेले प्रत्येक धोरण आणि आपण गाठलेली प्रत्येक बाजारपेठ शेवटी जगात कुठेतरी असलेल्या रुग्णाशी जोडलेली असते. ही जाणीवच आम्हाला शिस्तबद्ध आणि प्रेरित ठेवते," असे त्या सांगतात.

विज्ञानाधिष्ठित आणि उत्पादनकेंद्रित उद्योगात करिअर करण्याची इच्छा असलेल्या अनेक तरुणींना शिवानी वाघ यांची कहाणी प्रेरणादायी वाटते. जागतिक शिक्षण, भारतीय उद्योजकता, संवेदनशीलता आणि काटेकोर अंमलबजावणी यांचा संगम त्यांच्या कार्यात दिसतो. चार दशकांच्या परंपरेला नवी ऊर्जा देत त्या अधिक स्पर्धात्मक, नियमपालन करणाऱ्या आणि जागतिक स्तरावर जोडलेल्या भविष्यासाठी कंपनीला सज्ज करत आहेत.

सकाळ वर्धापन दिन निमित्त हार्दिक शुभेच्छा!










Sakal Readers Connect Initiative